**ठळक बातम्या**

- प्रत्येक विद्यार्थ्यानं आपल्या स्वतःच्या अभ्यासाच्या शैलीवर विश्वास ठेवावा, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं ‘परीक्षा पे चर्चा’ मधून आवाहन

- व्याजदर जैसे थे ठेवायचा रिझर्व्ह बँकेचा निर्णय, अवैध ऑनलाईन व्यवहारांमुळे नुकसान झालेल्या बँक ग्राहकांना २५ हजार रुपये भरपाई द्यायचा प्रस्ताव

- राज्यातल्या १२ जिल्हा परिषदा आणि १२५ पंचायत समित्यांसाठी उद्या मतदान, नागपूर, नाशिक, धुळ्यासह इतर ठिकाणी महापौर-उपमहापौरांची निवड

- गडचिरोली जिल्ह्यातल्या नक्षलवादी कारवाईत ३ नक्षलवादी ठार, जखमी झालेल्या जवानाचा मृत्यू

**आणि**

- १९ वर्षांखालच्या एकदिवसीय क्रिकेट विश्वचषक स्पर्धेच्या अंतिम सामन्यात नाणेफेक जिंकून फलंदाजीचा भारताचा निर्णय, वैभव सूर्यवंशीचं नाबाद शतक

**<><><><><>**

प्रत्येक विद्यार्थ्यानं आपल्या स्वतःच्या अध्ययन शैलीवर विश्वास ठेवावा असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. प्रधानमंत्र्यांनी आज 'परीक्षा पे चर्चा' या संवादात्मक कार्यक्रमाच्या नवव्या आवृत्तीत विद्यार्थ्यांशी संवाद साधला आणि परीक्षेच्या काळात तणावातून मुक्त राहण्यासाठी मार्गदर्शन केलं. विद्यार्थ्यांनी पालक आणि शिक्षकांच्या सूचनांकडे नीट लक्ष द्यावं, त्यावर विचार करावा आणि स्वतःचे अनुभव आणि आकलन यांची सांगड घालून आत्मविश्वासानं परीक्षांना सामोरं जावं, असा सल्ला त्यांनी दिला. योग्य अभ्यास, निरीक्षण आणि ज्ञानाचा वापर केल्याशिवाय कोणतंही कौशल्य मिळवता येत नाही यावर त्यांनी भर दिला.

***होल्ड... बाईट- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी***

**<><><><><>**

विरोधकांच्या गदारोळामुळे आजही लोकसभेचं कामकाज आधी दुपारी १२पर्यंत आणि नंतर दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं.

पुणे ते दिल्ली दरम्यान वंदे भारत, तेजस, राजधानी यासारख्या गाड्या सुरू कराव्यात, अशी मागणी राज्यसभा खासदार मेधा कुलकर्णी यांनी शून्य प्रहरादरम्यान केली. सत्ताधारी आणि विरोधी पक्षाच्या संमतीनं थोड्याचवेळापूर्वी राज्यसभेचं कामकाज सोमवारपर्यंत तहकूब करण्यात आलं.

**<><><><><>**

रिझर्व्ह बँकेच्या पतधोरण आढावा समितीनं आज व्याजदर जैसे थे ठेवण्याचा निर्णय घेतला. बुधवारपासून सुरू झालेल्या समितीच्या बैठकीतले निर्णय गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी आज जाहीर केले. याविषयी अधिक जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून...

***(होल्ड... व्हीसी- १.२५ सेकंद)***

*(रिझर्व्ह बँकेच्या पतधोरण आढावा समितीनं रेपो आणि इतर दर जैसे थे ठेवण्याचा निर्णय आज जाहीर केला. त्यामुळं रेपो दर सव्वा ५ टक्क्यांवर कायम राहणार आहे. डिसेंबर महिन्यात हा दर पाव टक्क्याने घटवण्यात आला होता. सोन्या-चांदीच्या दरात होत असलेल्या वाढीमुळं किरकोळ चलनवाढीचा दर आगामी आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहीत ४ टक्के राहील, असा रिझर्व्ह बँकेचा अंदाज आहे. यापूर्वी हा दर ३ पूर्णांक ९ दशांश टक्के राहील असं रिझर्व्ह बँकेनं डिसेंबरमध्ये सांगितलं होतं. आता रिझर्व्ह बँकेनं आर्थिक वृद्धी दराच्या अंदाजातही सुधारणा केली आहे. आगामी आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहीत आर्थिक वृद्धी दर ६ पूर्णांक ९ दशांश टक्के राहील असं रिझर्व्ह बँकेचं म्हणणं आहे. डिसेंबरमध्ये वर्तवलेल्या अंदाजात हा दर ६ पूर्णांक ७ टक्के राहील, असं रिझर्व्ह बँकेनं म्हटलं होतं.*

*अवैध इलेक्ट्रॉनिक बँकिंग व्यवहारांमुळं ग्राहकांना होणाऱ्या नुकसानीवर मर्यादा आणण्यासाठी दिशानिर्देशांचा मसुदा रिझर्व्ह बँक जाहीर करणार आहे. त्यानुसार छोट्या रकमेच्या नुकसानीसाठी ग्राहकांना २५ हजार रुपयांपर्यंत नुकसान भरपाई देण्याचा प्रस्ताव आहे. ही नुकसानभरपाई प्रत्येक ग्राहकाला एकदाच दिली जाईल. याबद्दलचे तपशील लवकरच दिले जातील, अशी माहिती गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी दिली.*

***होल्ड... बाईट- संजय मल्होत्रा***

*तसंच ज्येष्ठ नागरिकांच्या बँक खात्यातून ऑनलाइन व्यवहार करताना खबरदारीचे अतिरिक्त उपाय लागू करण्याचाही बँकेचा विचार आहे. याशिवाय बँकांचे वसुली एजंट आणि दिशाभूल करुन ग्राहकांना विकल्या जाणाऱ्या विविध वीमा आणि इतर योजनांच्या संदर्भात सुधारित दिशानिर्देशांचा मसुदाही रिझर्व्ह बँक लवकरच जाहीर करणार आहे.)*

**<><><><><>**

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतल्या काही लाभार्थ्यांना ई-केवायसी करण्यासाठी सरकारनं ३१  मार्चपर्यंत मुदतवाढ दिली आहे. या योजनेसाठी ई-केवायसी करण्याची मुदत ३१ डिसेंबरपर्यंत होती. त्यावेळी काही लाभार्थ्यांनी कुटुंबातला सदस्य सरकारी नोकरीत असल्यासंदर्भात चुकीच्या पर्यायाची निवड केली होती. या लाभार्थ्यांना योग्य पर्याय निवडण्यासाठी ३१ मार्चपर्यंत सरकारनं मुदतवाढ दिली आहे. त्यांना ऑनलाइन पद्धतीनं योग्य पर्याय निवडण्याची शेवटची संधी सरकारनं उपलब्ध करुन दिली आहे.

**<><><><><>**

राज्यातल्या १२ जिल्हा परिषदा आणि १२५ पंचायत समित्यांसाठी उद्या मतदान होणार आहे. सकाळी साडे ७ वाजता मतदानाला सुरुवात होईल आणि संध्याकाळी साडे पाचपर्यंत मतदान सुरू राहणार आहे. या निवडणुकीची मतमोजणी

सोमवारी, ९ फेब्रुवारीला होणार आहे. जिल्हा परिषदेच्या ७३१ जागांसाठी २ हजार ६२४ उमेदवार रिंगणात आहेत. तर पंचायत समित्यांच्या १ हजार ४६२ जागांसाठी ४ हजार ८१४ उमेदवार निवडणूक लढवत आहेत. जिल्हा परिषदेसाठी सर्वाधिक २९४ उमेदवार धाराशिवमध्ये तर पंचायत समित्यांसाठी सर्वाधिक ४९६ उमेदवार पुण्यातून निवडणूक रिंगणात आहेत.

**<><><><><>**

**नागपूर** महानगरपालिकेच्या महापौरपदी भाजपच्या नीता ठाकरे तर उपमहापौर पदी भाजपच्याच लीला हातीबेड निवडून आल्या आहेत. त्यांनी काँग्रेसच्या उमेदवारांचा पराभव  केला.

**कोल्हापूर** महानगरपालिकेच्या महापौरपदी भाजपच्या रूपाराणी निकम  तर उपमहापौरपदी जनसुराज्य शक्ती पक्षाचे अक्षय जरग यांची निवड झाली आहे. काँग्रेसच्या दोन्ही उमेदवारांचा पराभव करून कोल्हापुरात प्रथमच महायुतीचे उमेदवार निवडून आले आहेत.

**धुळे** महानगरपालिकेच्या महापौर पदावर भाजपाच्या मायादेवी परदेशी यांची तर उपमहापौर पदावर ज्योत्स्ना पाटील यांची आज निवड झाली. प्रतिस्पर्धी शिवसेना-राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या आणि एमआयएमच्या उमेदवारांचा त्यांनी पराभव केला.

**नाशिकच्या** महापौर म्हणून भाजपाच्या हिमगौरी आडके तर उपमहापौर म्हणून शिवसेनेचे विलास शिंदे यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे. ही निवडणूक प्रक्रिया आज सकाळी पार पडली. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या उमेदवार सीमा पवार यांनी माघार घेतल्याने हिमगौरी आडके यांच्या बिनविरोध निवडीचा मार्ग मोकळा झाला. भाजपाने शिवसेनेला उपमहापौरपद दिल्याने विलास शिंदे वगळता अन्य सर्व उमेदवारांनी माघार घेतली.

**अहिल्यानगर** महानगरपालिकेच्या महापौर म्हणून राष्ट्रवादी काँग्रेसच्या ज्योती गाडे आणि उपमहापौर म्हणून भारतीय जनता पक्षाचे धनंजय जाधव यांची बिनविरोध निवड झाली.

**जळगाव** महानगरपालिकेच्या महापौरपदी भाजपाच्या दीपमाला काळे यांची तर उपमहापौरपदी शिवसेनेचे मनोज चौधरी यांची आज बिनविरोध निवड झाल्याचं जिल्हाधिकाऱ्यांनी जाहीर केलं.

**जालना** महानगरपालिकेच्या पहिल्या महापौरपदी भाजपच्या वंदना मगरे तर उपमहापौरपदी भाजपाचेच राजेश राऊत यांची आज बिनविरोध निवड झाली.

**<><><><><>**

एशियन सीड काँग्रेस हा निव्वळ एक कार्यक्रम नसून अन्न आणि वस्त्रनिर्मिती क्षेत्राची सुरक्षेविषयी चर्चा करणारी एक जागतिक परिषद आहे, असं प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज मुंबईत केलं. ते आज एशियन सीड काँग्रेस परिषदेच्या उद्घाटन सत्राला संबोधित करत होते. केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान यावेळी उपस्थित होते. देशातल्या शेतकऱ्यांचं उत्पन्न दुप्पट व्हावं यासाठी केंद्रीय कृषीमंत्री प्रयत्नशील आहेत, असं मुख्यमंत्री म्हणाले.

**<><><><><>**

गडचिरोली जिल्ह्याच्या सीमावर्ती भागात सुरू असलेल्या नक्षलविरोधी कारवाईत आणखी २ नक्षलवादी ठार झाले आहेत, तर कारवाईदरम्यान जखमी झालेल्या एका जवानाचा मृत्यू झाला आहे. ३ दिवसांपासून सुरू असलेल्या या कारवाईत आत्तापर्यंत ३ नक्षलवादी मारले गेले आहेत. यात एका महिलेचाही समावेश आहे. यात कारवाईत पोलिसांनी नक्षलवाद्यांचे २ तळ उद्ध्वस्त केले आहेत.

**<><><><><>**

१९ वर्षांखालच्या एकदिवसीय क्रिकेट विश्वचषक स्पर्धेच्या अंतिम सामन्यात भारत आणि इंग्लंड यांच्यात हरारेमध्ये सामना सुरू आहे. या सामन्यात भारतानं नाणेफेक जिंकून फलंदाजीचा निर्णय घेतला आहे. सलामीवीर एरॉन जॉर्ज ९ धावांवर बाद झाल्यानंतर वैभव सूर्यवंशी आणि आयुष म्हात्रेनं डाव सावरला. सुर्यवंशीनं ५५ चेंडूंमध्ये शतक झळकावलं, तर आयुष म्हात्रेनं ५१ चेंडूंमध्ये ५३ धावा केल्या. सध्या वैभव सूर्यवंशी आणि वेदांत त्रिवेदी खेळत आहेत.

शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा भारताच्या २५ षटकांत २ गडी बाद २५० धावा झाल्या होत्या.

//<><><><><>//